दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २०१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२१ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मंत्रीमंडळ विस्तार रखडणार; नाराजांना महामंडळाचा खुराक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात नवीन सरकार येऊन तीन महिने उलटले. वीस मंत्र्यांवरच राज्य कारभार सुरू आहे. दुसरा विस्तार होत नसल्याने सध्या मंत्रीपदासाठी देव पाण्यात ठेवून बसलेल्या इच्छुक आमदारांची नाराजी वाढत आहे. विस्तार आणखी लांबणीवर पडणार असल्याची चिन्हे आहेत. यामुळे ही नाराजी काही प्रमाणात दूर करण्यासाठी महामंडळ वाटपाचा खुराक पुढे करण्यात आला आहे. त्यासाठी सध्या राजकीय हालचालींना वेग आला आहे. महामंडळ आणि इच्छुकांची नावांची यादी तयार करण्याचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे.

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर मोठ्या प्रतिक्षेनंतर मंत्रीमंडळाचा विस्तार करण्यात आला. त्यामध्ये अठरा जणांना संधी देण्यात आली. मुख्यमंत्री शिंदे यांच्यासोबत ४० आमदार शिवसेना सोडून आले. पण त्यातील केवळ नऊ आमदारांनाच मंत्रीपद मिळाले. या पदावर डोळा ठेवत गुवाहाटी गाठलेल्या आमदारांची संख्या मोठी होती. पण अनेकांना ते न मिळाल्याने मोठी नाराजी निर्माण झाली.

# रायगड जिल्ह्यातील २० हजार कोटींच्या कागद निर्मिती उद्योगास मान्यता

### राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकीला चालना देणार / उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीचा निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**कोविडमुळे मंदावलेला उद्योग क्षेत्राचा वेग वाढवण्यासाठी टाळेबंदीच्या काळात, राज्यातील ज्या उद्योगांना परताव्याचे दावे दाखल करता आले नाहीत, त्यांचे असे दावे मंजूर करण्याकरिता औद्योगीक प्रोत्साहन अनुदान कालावधी दोन वर्षांनी वाढविण्याचा निर्णय उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. बैठकीत रायगड जिल्ह्यातील सिनारमन्स पल्प या कागद निर्मितीच्या वीस हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या उद्योगासह अन्य उद्योग प्रकल्पांनाही मान्यता देण्यात आली. राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीला मोठी चालना देण्यासाठी महत्वपूर्ण उपाययोजना करण्यास प्राधान्य देण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंत्रिमंडळ उपसमितीची तिसरी बैठक मंत्रालयात झाली. बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनोज सौनिक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, वित्त विभागाचे प्रधान सचिव राजगोपाल देवरा, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, औद्योगीक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा, उद्योग विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह आदी उपस्थित होते.

मंत्रिमंडळ उपसमितीने राज्यातील घटकांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशींचा विचार करुन अशा विविध ११ प्रकरणात उद्योग घटकांना प्रोत्साहन अनुदान संदर्भातील तसेच अन्य मागण्यांसंदर्भात सविस्तर चर्चा करुन लाभ देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळेही या उद्योग घटकांना सर्वसाधारणपणे ३० हजार कोटींचा लाभ मिळेल, असा अंदाज आहे.

विविध उद्योग घटकांना प्रोत्साहन देतानाच, स्थानिकांसाठी रोजगार निर्मितीसाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. विशेषतः नाणार रिफायनरीसह, मोठी गुंतवणूक, रोजगार संधी असणाऱ्या उद्योगांना विशेष निमंत्रण देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सिनारमन्स पल्प ॲण्ड पेपर प्रा. लि. (एशिया पेपर ॲण्ड पल्प) हा आशियातील सर्वात मोठा कागद निर्मिती क्षेत्रातील उद्योग आहे. हा उद्योग भारतात प्रथमच वीस हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करणार आहे. इंडोनेशियातील हा समुह भारतात पहिल्यांदाच असा प्रकल्प आणि तोही महाराष्ट्रात उभारण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने रायगड जिल्ह्यातील धेरंड येथे या प्रकल्पासाठी यापुर्वीच तीनशे एकर जागा देण्यात आली असून, प्रकल्पाच्या मागणीनुसार अधिकची जागा देण्याचा शासनाचा मानस आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला मान्यता देताना प्रकल्पस्थळ व आजुबाजुच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वाढणारे उद्योग व त्यामुळे मोठ्या प्रमाणात होणारी रोजगार निर्मिती लक्षात घेऊन मंत्रिमंडळ उप समितीने या प्रकल्पाला मान्यता देऊन, राज्यात नव्हे तर देशात अशा प्रकारचा पहिलाच प्रकल्प मिळविण्यात पहिले स्थान मिळवले आहे.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वृक्ष दत्तक योजनेचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वृक्ष दत्तक योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आली असून या योजनेचा शुभारंभ महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज (गुरुवार, दि. २०) महाविद्यालयाच्या प्रांगणात नारळाचे रोप लावून करण्यात आला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य एडवोकेट भगीरथ शिंदे हे उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व जिल्हा परिषद सदस्य प्रकाश निकम, सीए कुणाल लाडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, उपप्राचार्य एस. इ. संदनशीव तसेच शिक्षक वर्ग, विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या स्टाफने प्रत्येक विद्यार्थ्यांना वृक्ष सप्रेम भेट दिले असून त्याचे वृक्षारोपण संवर्धन व देखभाल त्या विद्यार्थ्यांनी करावयाचे आहे. सद-रचे वृक्ष आपल्या घराजवळ रोपण करून पालकांसोबत सेल्फी काढून झाडाची प्रोग्रेस महाविद्यालयाला व्हाट्सअप वर कळवायचे आहे.

तसेच या झाडांना क्यू आर कोड देऊन त्या संदर्भातील माहिती संकलित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने ६०० विद्यार्थ्यांना केशर आंबा रोपांचे वाटप केलेले आहे. या कार्यक्रमासाठी वनविभागाचे वनाधिकारी निकम यांनी देखील दीडशे काजूची रोपे महाविद्यालयास स्वतःच्या खर्चातून दिलेली आहेत. महाविद्यालयाने महाविद्यालय परिसरात व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या घरात वृक्ष संवर्धनाची चळवळ जावी या उद्देशाने हा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. या उपक्रमाचे लोकनेते रामशेठ ठाकूर, ॲड. भगीरथ शिंदे यांनी कौतुक करून या योजनेला शुभेच्छा दिल्या आहेत.

## कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांसह ७ बैल-रेडे हस्तगत

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांच्या पाळीव पशूंची वाहतूक आणि कत्तलीसाठी खरेदी मोठ्या प्रमाणात होत असून बुधवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास दोन वाहनांसह सुमारे ७ बैल आणि रेडे हस्तगत करण्यात पोलादपूर पोलीस ठाण्याला यश आले आहे.

पोलादपूर महाबळेश्वर रोडवर कापडे गावाच्या हद्दीतील इश्वर ढाब्याजवळ सफेद रंगाची महिंद्रा बोलेरो पिकअप (क्र.एमएच १३ डीक्यू २७३६) अंदाजे किंमत ५ लाख रूपये आणि सफेद रंगाची टाटा इंडी व्ही-०३ गाडी (क्र.एमएच १३डीक्यू २४६२) अंदाजे किंमत ४ लाख रूपये या दोन गाड्यांमधून ५ गोवंश बैल आणि २ रेडे अंदाजे एकूण किंमत ६० हजार रूपये घेऊन पशूवैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र न घेता, वाहतूकीसाठी आवश्यक प्रमाणपत्र व प्रथमोपचार साहित्य तसेच गुरांना वैरण व पाणी न बाळगता कत्तल करण्याच्या हेतूने वाहतूक करीत असताना पोलादपूर पोलीसांनी ही दोन्ही वाहने हस्तगत केली. यावेळी दोन्ही वाहनांतील समीर सुरेश भालेराव (२०, सरकोली, सोलापूर), अजय सिताराम इंगाले (२०, दामाजीनगर, मंगळवेढा, सोलापूर), रवींद्र भानुदास ऐवळे (२४, दामाजीनगर, मंगळवेढा, सोलापूर) आणि आशिष अंकुश मोरे (२६, दिविल बौध्दवाडी, ता.पोलादपूर) या चार आरोपींना ताब्यात घेतले असता चारही जणांकडे वाहन चालविण्याचा परवाना तसेच वाहनाची कागदपत्रे बाळगली नसल्याचे आढळून आले.

याखेरिज, वाहनांतील जनावरांना दुखापत होऊ नये यासाठी खबरदारी घेतली नसल्याचे तसेच जनावरे कोणाकडून खरेदी केली याबाबतची कागदपत्रे नसल्याचे तपासात निष्पन्न झाल्यामुळे पोलादपूर पोलीसांनी पोलीस नाईक इकबाल शेख यांच्या फिर्यादीनुसार पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक भोसले हे अधिक तपास करीत असून आरोपींविरूध्द गुन्हा र.नं.९४-२०२२ नुसार भादंवि ३७९ आणि ३४ कलमान्वये तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९६४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलादपूर पोलीसांनी ताब्यात घेतलेल्या पाच गोवंश बैल आणि दोन रेडे या जनावरांना महाड येथे चेतनदादा उतेकर यांच्या अध्यक्षतेखाली चालणाऱ्या गोशाळेमध्ये ठेवले आहे.



## सिडकोच्या व्यवसाय सुलभता कक्षाचे उद्घाटन

### विविध सेवा एकाच पोर्टलवर उपलब्ध



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडको महामंडळाच्या व्यवसाय सुलभता कक्षाचे उद्घाटन २० ऑक्टोबर २०२२ रोजी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या शुभहस्ते सिडकोचे मुख्यालय असलेल्या सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन येथे करण्यात आले. मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर व्यवसाय सुलभता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. मा. मुख्यमंत्री यांनी बांधकाम क्षेत्राच्या उन्नतीसाठी हा पुढाकार घेण्याची घोषणा केली होती. आपल्या बहुतांशी सेवा ऑनलाइन माध्यमाद्वारे उपलब्ध करून दिल्यानंतर, ई-प्रशासनाच्या दिशेने सिडकोने टाकलेले हे आणखी एक क्रांतिकारी पाऊल आहे. या प्रसंगी श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, श्री. शशिकांत महावरकर, मुख्य दक्षता अधिकारी, विभागप्रमुख, श्री. मधु पाटील, अध्यक्ष, एमसीएचआय, रायगड आणि सिडकोचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सिडकोने ई-प्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मालमत्ता हस्तांतरण, बांधकाम परवाना, वसाहत सेवा इ. सेवा यापूर्वीच ऑनलाइन माध्यमाद्वारे उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे नवी मुंबईतील नागरिकांना केवळ एका क्लिकद्वारे सिडकोशी संबंधित सेवांचा लाभ घरबसल्या घेणे शक्य झाले आहे. परंतु या सर्व सेवा एकाच ठिकाणी 'एक खिडकी निपटारा' (सिंगल विंडो क्लिअरन्स) पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सिडकोतर्फे व्यवसाय सुलभता (ईज ऑफ डुइंग बिझनेस) पोर्टलची निर्मिती करण्यात

.../२

> व्यवसाय सुलभता पोर्टलमुळे सिडकोच्या सेवांचे सुलभीकरण, सुसूत्रीकरण आणि डिजिटलायजेशन होऊन सर्वसामान्य नागरिक, गुंतवणूकदार, बांधकाम व्यावसायिक, विकासक अशा विविध घटकांना अधिक जलद, पारदर्शक व कार्यक्षम सेवा मिळणार आहे. तसेच यामुळे नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर या लौकिकात भर पडणार आहे.
>
> **डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## युनिटी फॅबटॅक इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला भीषण आग

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड उद्योग वसाहती मधील युनिटी फॅबकेट इंडस्ट्रीज कंपनीला भिषणआग लागली असून या आगीमध्ये कंपनीचे कार्पेट गोडावून जळून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीवर नियंत्रण आणण्यासाठी महाड औद्योगिक वसाहत आणि महाड नगरपालिकेच्या फायर फायटरनी यश मिळविले आहे. सदर कंपनीत कारपेट व नामदा गाड्यांच्या आत मध्येखाली टाकण्यात येणार फ्लॅग बनवले जाते.

गुरुवारी दुपारी कारखाना सुरु असतांना कच्चामाल ठेवलेल्या गोडाऊनमधील इलेक्ट्रीक पॅनलला शॉर्ट सर्किटमुळे भिषण आग लागली आहे या आगीमध्ये गोडावून मधील संपूर्ण कच्चा माल शंभर टक्के जळून लाखो रुपयांच नुकसान झाले असून यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवित हानी किंवा कोणी जखमी झालेले नाही.



सदर आग इतकी मोठी आहे. या ठिकाणी आग विझवण्यासाठी चार ते पाच अग्निशमन दलाच्या गाड्या शर्तीचे प्रयत्न करत असून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र कारपेट आणि काही प्रमाणात ऑईल चे ड्रम यांनी पेट घेतल्याने आग आटोक्यात येत नाही मात्र सदर आगीत कोणही जखमी अथवा गंभिर जखमी झाले नाही अशी माहिती प्रथम दर्शनी दिसून येत आहे. याआगीची माहिती समजताच महाड औद्योगिक वसाहत पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरिक्षक एम.एस. आंधळ त्यांचा संपूर्ण स्टाफ घटनास्थळी दाखल झाला.

## कोविड-१९ मुळे अनाथ झालेल्या बालकांना पनवेल मिशन वात्सल्य समितीकडून दिवाळीनिमित्त विविध वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोविड-१९ मुळे आई-वडील असे दोन्ही पालक गमावलेल्या चार अनाथ बालकांपैकी अनिकेत बाबू दडस (वय १७ वर्षे), स्वर्णिम अश्विन काकडे (वय ४ वर्षे) या दोन अनाथ बालकांना जिल्हाधिकारी तथा मिशन वात्सल्य समिती, रायगड चे अध्यक्ष डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय मिशन वात्सल्य समिती पनवेल, ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्र, रोटरी क्लब, हिंदाल्को कंपनी, युवा स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत दिवाळी सणानिमित्त मिठाई, फराळ, शालेय साहित्य आदी वस्तूंचे वाटप तहसिल कार्यालयात तहसिलदार तथा पनवेल मिशन वात्सल्य समितीचे अध्यक्ष विजय तळेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

तसेच यावेळी राज कृष्णा पाटील (वय १५ वर्ष), सलोनी कृष्णा पाटील (वय १३ वर्षे) ही अनाथ भावंडे तहसिल कार्यालयात उपस्थित राहू न शकल्यामुळे मिशन वात्सल्य समिती पनवेल यांनी याची दखल घेत त्यांच्या घरी जावून मिठाई, फराळ, शालेय साहित्य आदी वस्तूंचे वाटप केले.

याप्रसंगी बाल विकास प्रकल्प अधिकारी चेतन गायकवाड. विस्तार अधिकारी श्रीमती वैशाली वैद्, हिंदाल्को कंपनीचे वरिष्ठ अधिकारी श्री.लहू रौंधाल, ग्राम स्वराज्य समिती महाराष्ट्र चे सचिव श्री.अल्लाउद्दीन शेख उपस्थित होते.



# सिडकोच्या विकासाला जमिनी देण्यास शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

**दै.रायगड नगरी । उरण**

१२ऑक्टोबर २०२२ रोजी सिडकोने नागाव, रानवड येथील जमिनी संपादनाचा निर्णय घेतला आहे. या विरोधात नागाव,केगाव व म्हातीवली ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी बुधवारी चिंबळथळी येथील सभागृहात बैठक आयोजित केली होती.या बैठकीत रामचंद्र म्हात्रे, भूषण पाटील, संजय ठाकूर, जगदीश तांडेल, अ‍ॅड.दिपक ठाकूर, अ‍ॅड. सागर कडू यांनी संबोधित केले.

तर या प्रसंगी महेश म्हात्रे व चारुदत्त पाटील माजी पंचायत समिती सदस्य, कॉम्रेड मधुकर म्हात्रे,कॉम्रेड. नयन म्हात्रे यांनी देखिल यथोचित मांडणी केली. सभेच्या व्यासपीठावर रंजना पाटील,सरपंच म्हातवली,चेतन गायकवाड सरपंच,नागाव व चिंतामण पाटील प्रभारी सरपंच केगाव या तिन्ही ग्रामपंचायतीचे सरपंच उपस्थित होते.या शिवाय तिन्ही ग्रामपंचायत मधील जेष्ठ नागरिक,माजी सरपंच, सदस्य, महीला उपस्थित होत्या.



या बैठकीत २७ ऑक्टोबरला सिडकोच्या भूमापन विभागाच्या अधिकाऱ्यांना मोर्चाने जाऊन हरकती दाखल करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे. शुक्रवारी जाहीर सभा चाणजे विभाग, नागाव, रानवड ग्रामस्थांची सिडकोच्या भूसंपदानाच्या जाहीर सुचने विरोधात आज शुक्रवारी २१ ऑक्टोबरला दुपारी ३ वाजता आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह , तेलीपाडा , उरण येथे या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडकोने आपल्या चाणजे , नागाव, रानवड परिसरातील आपल्या मालकीच्या शेतजमिनी आपल्या मूळ गावठाणाबाहेरील घरादारांसह संपादित करण्यासाठी १२ ऑक्टोबर रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. राज्य सरकार सिडकोचा हा निर्णय आपल्याला देशोधडीला लावणारा आहे. या निर्णय अधिसूचनेला विरोध दर्शविण्यासाठी आणि पुढील सर्वसमावेशक दिशा ठरविण्यासाठी जाहीर सभेला चाणजे विभाग, नागाव, केगाव, रानवड येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सिडको प्रकल्पग्रस्त कृती समिती चाणजे विभागाचे अध्यक्ष अरविंद घरत व सेक्रेटरी श्रीराम म्हात्रे यांनी केले आहे.

# धानकान्हे येथे नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील धानकान्हे येथे तालुका कृषी कार्यालय यांच्या वतीने नैसर्गिक शेती प्रशिक्षण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न आला.

तालुका कृषी अधिकारी एम बी करे, कृषी पर्येक्षक एम जी जामकर सहाय्यक कृषी अधिकारी एस आर शिंदे, बी टी एम आत्मा श्री परमेश्वर गाडे धानकान्हे, देवकान्हे नदवली शेतकरी अधिवासी महिला पुरुष उपस्थित होते.या कार्यक्रमातंर्गत प्रशिक्षक स्कील फाऊण्डेशन पुणे येथील माधुरी देशपांडे यांनी शेतकरी वर्गाला महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. तसेच तालुका कृषी अधिकारी एम बी करे कृषी पर्यवेक्षक एम जी जामकर सहाय्यक कृषी अधिकारी सौ सरिका दिघे/ सावंत यांनी रब्बी हंगाम नियोजन मार्गदर्शन केले सदर कार्यक्रम नियोजन सौ सारिका दिनेश दिघे सहाय्यक कृषी अधिकारी चिल्हे यांनी केले.याप्रसंगी उपस्थित शेतकरी बांधवांनी शेती संबंधी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान केले.तर तालुका कृषी कार्यालय यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे शेतकरी वर्गाने स्वागत करून समाधान व्यक केले.

# राष्ट्रीय पॉवरलिफ्टींग स्पर्धेत रायगडचे यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय पॉवरलिफ्टिग ज्युनिअर आणि मास्टर स्पर्धा नुकतीच भद्रावती जिल्हा चंद्रपूरयेथे पार पडली. सदर स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघातून सीनिअर महिला स्पर्धेत अमृता भगत ही ४७ किलो वजनी गटात सहभागी झाली होती. तिने या स्पर्धेत सिल्व्हर मेडल प्राप्त केले. तिने स्कॉट या प्रकारात गोल्ड, तर बेंचप्रेस आणि डेड लिफ्ट या प्रकारात सिल्व्हर मेडल घेतले आहे.

तसेच मास्टर (४० वर्षावरील) स्पर्धेत ५९ किलो वजनी गटात २ रा क्रमांकासह सिल्व्हर मेडल प्राप्त केले आहे. महेश पाटील यांना सुद्धा स्कॉट या प्रकारात सुवर्ण आणि बेंचप्रेस व डेड लिफ्ट या प्रकारात सिल्व्हर मेडल प्राप्त झाले आहे.

या खेळाडूंच्या यशाबाबत रायगड पॉवरलफ्तिंटिंगचे अरुण पाटकर, गिरीष वेदक, सचिन भालेराव, राहुल गजरमल यांनी आनंद व्यक्त केला आहे. या स्पर्धेत खेळाडूंना विक्रांत गायकवाड यांचे सहकार्य आणि अरुण पाटकर यांचे मार्गदर्शन लाभले.

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे. देव इंटरप्रायजेस तर्फे प्रो.प्रा.श्री.इंद्रदेव रामफेर शर्मा रा.२०४, कस्तुरी हाईट्स, प्लॉट नं.३९, सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई-४१०२१० यांनी मुळ मालक श्री.विष्णू बामा भोईर, रा.मोहोचा पाडा, मोहो, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत खरेदीखताद्वारे आपल्या नावे हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मोहो, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ८१/३ | भोगवटादार वर्ग-२ | ०-५०-०० | १०.०० |
| | एकूण | ०-५०-०० | १०.०० |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणत्याही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे
दि.२०/१०/२०२२

सही/-
**अ‍ॅड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर, ग्राऊंड फ्लोअर, सेक्टर १ ए, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**

# केदार भगत व केदार भगत मित्र परिवाराच्या माध्यमातून सुगंधी उटण्याचे प्रकाशन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिवाळी सणानिमित्त भाजपचे युवा नेते केदार भगत आणि केदार भगत मित्र परिवाराच्या माध्यमातून सुगंधी उटण्याचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख उपस्थितीत त्यांच्या शुभहस्ते करण्या आली. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाजपा युवानेते केदार भगत यांनी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. या वेळी सुमित दसवते, पत्रकार केवल महाडीक, शेषनाथ गायकर, योगेश साळवी, हर्षद गडगे, भावेश शिंदे, संकेत दसवते, नितेश भगत, रवी परचे, ब्रिजेश बहिरा, संतोष वर्तले, यज्ञेश पाटील आदी उपस्थित होते.

अ‍ॅड.उज्वला अमित दंडवते

## जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३३५/२०२२
नि.नं.८/ड

१) श्रीमती.प्रियांका रोहन गावकर
रा.बी.५३४/४, नागेश पाटील वाडी नं.२,
एन.जी.आचार्यमार्ग, नियर बालमित्र व्यायामशाळा,
चेंबुर (ईस्ट), मुंबई-४०००७१
२) श्रीमती.प्रमोदिनी न्हानू गावकर
रा.आर/एन २१७, नागेश पाटील वाडी नं.२,
घाटला व्हिलेज, नियर बालमित्र व्यायामशाळा,
चेंबुर (ईस्ट), मुंबई-४०००७१ अर्जदार

अर्जदार क्र.१ श्रीमती.प्रियांका रोहन गावकर यांचे पती व अर्जदार क्रमांक २ श्रीमती.प्रमोदिनी न्हानू गावकर यांचा मुलगा श्री.रोहन न्हानू गावकर हे दि.३/०१/२०२२ त्वाम हॉस्पिटल-अल एन (अबु धाबी-यु ए ई) येथे मयत झाले असून त्यांच्या मालकीची मिळकत खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

Flat No.1003, Tenth Floor having an approximate Carpet area of 614.926 Sq. ft., Flower Bed-48 Sq. ft. Dry Balcony-32 Sq. Ft. & Terrace 98 Sq. Ft. in the building "Ishwar Aura" constructed on Plot No.A-13 in Sector-8 (PT) situated at Ulwe of 12.5% GES Scheme, Navi Mumbai Tal-Panvel, Dist-Raigad (50% shares)

वरील मिळकतीबाबत अर्जदाराचे नाव वारस दाखला मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केला आहे. तरी वरील मिळकतीबाबत जर कोणाची काही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध अगर तक्रारी असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांत या न्यायालयात करावी. वरील मुदतीत कोणाची हरकत वा तक्रार न आल्यास व अर्जदाराचे हक्कशाबीत झाल्यास अर्जदाराचे विनंतीप्रमाणे त्यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दि.१८/१०/२०२२ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

## शिवम् गृहनिर्माण सह. संस्था, मर्या.

नोंदणी क्र.आरजीडी/केजेटी/एचएसजी/(टीसी)/२२११/सन २००९
कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड

### जाहिरात

सर्व तमाम बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स (विकासक) यांना या जाहिरातीने सुचित करण्यात येते की, नगर भूमापन क्रमांक ७४४ क्षेत्रफळ २४.२० चौरस मीटर, नगर भूमापन क्रमांक ७४५ क्षेत्रफळ ७३३.८० चौरस मीटर, ७४८ क्षेत्रफळ ७७.३० चौरस मीटर, ७४९ क्षेत्रफळ ३३.०० चौरस मीटर व ७५० क्षेत्रफळ २८.१० चौरस मीटर असे एकूण क्षेत्रफळ ८९६.४० चौरस मीटर सत्ता प्रकार 'क' मौजे : भिसेगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील भूखंडावर विद्यमान मालक शिवम् गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, जिचा नोंदणी क्रमांक आरजीडी/केजेटी/एचएसजी/(टीसी)/२२११/सन २००९ आहे. आम्ही आमची इमारत पुर्नबांधणीसाठी देण्याचे दि.०९/१०/२०२२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक २ नुसार सर्वानुमते निश्चित केले आहे. त्यासाठी संस्थेने बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्स (विकासक) यांचेकडून स्वारस्य पत्र (इंटरेस्ट लेटर) या जाहिरातीने मागवत आहोत. ज्या विकासकाला इमारत पुर्नबांधणीमध्ये स्वारस्य आहे. त्या विकासकाने सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खाली सही करणार अध्यक्षा सौ.संध्या विजय गमरे (मो.नं. ८५५०९२९०५६), खजिनदार श्री.रमेश अ. सातपुते (मो.नं. ९२८४९१५६३७) व सचिव श्री.विशाल शिवाजी वावळकर (मो.नं. ९७६६६३९२३३) यांच्याशी संपर्क साधून शिवम् गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, बी विंग, सदनिका क्रमांक ००८, पहिला मजला येथे आपल्या निवेदिका विहित मुदतीत सदर पत्यावर यांच्याकडे पाठवावे. सदर प्रक्रियेसाठी संस्थेकडे खालील कागदपत्रे उपलब्ध आहेत.

१) संस्थेचे नोंदणीपत्र
२) संस्थेचे नावे असलेले मालमत्ता पत्रक
३) बांधकाम परवानगी
४) भोगवटा प्रमाणपत्र
५) इमारत नकाशा
६) संस्थेच्या अटी व शर्ती
७) दिनांक ०९/१०/२०२२ रोजीचा संस्थेचा ठराव क्रमांक-२ ची छायांकित प्रत
८) संस्थेतील सभासदांची यादी

| अ.क्र. | सभासदाचे नाव | सदनिका क्रमांक | दस्त क्रमांक | बिल्टप क्षेत्र | कारपेट क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

सही/-
**सचिव / अध्यक्ष**
**शिवम् सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**कचेरी रोड, कर्जत-रायगड**

अर्जदारातर्फे वकील
अ‍ॅड.एस.एन.गायकवाड

## जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१०३४/२०२२
ने.ता.२२/११/२०२२

श्री.नंदराज नारायण मुंगाजी
वय : ५३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.घर नं.४८६, ओवळे, उरण पनवेल रोड,
आर झेड पी शाळेजवळ, मु.ओवळे, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
मा.पंचायत समिती सो
ग्रामसेवक अधिकारी
ग्रामपंचायत ओवळे
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या आजी कै. गोमुबाई नामदेव मुंगाजी यांचा मृत्यू दि.२५/११/१९७७ रोजी रा.घर नं.४८६, ओवळे, उरण, पनवेल रोड, राजिप शाळेजवळ मु.ओवळे, पो. पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड, पिन कोड ४१०२०६ येथे राहत्या घरी झालेला आहे. अर्जदार यांनी यांच्या आजी कै.गोमुबाई नामदेव मुंगाजी यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता, पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.गोमुबाई नामदेव मुंगाजी वरील नमूद ठिकाणी मयत झालेले आहेत किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १ महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या कायदेशीर हरकती नोंदविण्याचे आहेत या लेखावरुन असे कळविण्यात येत आहे की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न आल्यास तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून, त्यांस सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.१७ माहे १०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

गोडसे मॅडम कोर्ट
वकील : अ‍ॅड.आशिष पनवेलकर

## जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१२२७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/१२/२०२२

ग्रेसी विल्सन यांचे मयत यांचे कायदेशीर वारस
१) श्री.पुलीकल वरील विल्सन
वय : ७१ वर्षे, व्यवसाय : सेवानिवृत्त
रा.ए ००६, रेलविहार सीएचएस, एलटीडी प्लॉट नं.४,
सेक्टर ४, खारघर ४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्रीमती.विन्सी नरेशकुमार
पुर्वाश्रमीचे नाव विन्सी विल्सन
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.६०४ द आर्चिड सोसायटी,
हिंडेवाडी रोड हडपसर पुणे ४११०२८ अर्जदार क्र.१ व २
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीशीने सर्व जनतेस कळविण्यात येते की, ग्रेसी विल्सन ह्या मयत यांचे कायदेशीर वारस अर्जदार क्र.१ यांचे पती असून अर्जदार क्र.२ ही त्यांची मुलगी आहे. यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत. ग्रेसी विल्सन यांचा मृत्यू दि.२४/०४/२०२१ रोजी राहत्या घरी अपोलो हॉस्पिटल प्लॉट नं.१३, सेक्टर २३ सीबीडी बेलापूर नवी मुंबई येथे झाला.

**ग्रेसी विल्सन यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**
**फ्लॅट नं.ए ००६, तळमजला, रेल विहार को.ऑप.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.४, सेक्टर ४, खारघर, पिनकोड नं.४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड, राज्य : महाराष्ट्र**

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदारांशिवाय कोणीही या मिळकतीला वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१९ माहे १० सन २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

अर्जदाराचे वकील : अ‍ॅड.विपुल रमाकांत ठाकूर

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२२

१) श्रीमती.चांगुना प्रकाश पाटील
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.धर्मेंद्र प्रकाश पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.संदीप प्रकाश पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ ते ३ रा.मु.पागोटे,
ता.उरण, जि.रायगड ४००७०७
४) श्री.करुण प्रकाश पाटील
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
५) श्री.अजय प्रकाश पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
वरील ४ ते ५ रा.मु.कुंडेगाव
ता.उरण, जि.रायगड ४००७०७ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.प्रकाश कमळ्या पाटील यांचे दि.०६/१०/२०२१ रोजी मौजे : पागोटे, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले आहे. अर्जदार हे कै.प्रकाश कमळ्या पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.प्रकाश कमळ्या पाटील यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : नवघर ५३/८५ | ३४९ | ३ | ०-३-८ |
| २ | | ३४९ | ११ | ०-९-० |
| ३ | | ३४९ | १३ | ०-०-४ |
| ४ | | १८५ | ७ | ०-७-१२ |
| ५ | मौजे-नवघर २०४/८५ | १६३ | १३ | ०-३-१२ |
| ६ | मौजे : नवघर ३०५ | १५९ | १० | ०-८-४ |
| ७ | मौजे : नवघर २१६ | १५७ | ३ | ०-८-१२ |
| ८ | मौजे : नवघर ५२/८५ | १४९ | ६ | ०-५-० |
| ९ | | १५० | ७ | ०-५-४ |
| १० | | १५२ | ५ अ | ०-३-८ |
| ११ | | १५२ | ९ | ०-१२-४ |
| १२ | | १५३ | ११ | ०-१०-८ |
| १३ | | १५३ | १३ | ०-११-० |
| १४ | | १५५ | २ | ०-१२-१५ |
| १५ | | १५६ | २ | ०-८-४ |
| १६ | | १५७ | २ | ०-७-१२ |
| १७ | | १५७ | ९ | ०-८-० |
| १८ | | १५८ | ९ | ०-५-१२ |
| १९ | | १५८ | ११ | ०-६-८ |
| २० | | १६० | ९ | ०-४-१२ |
| २१ | | १६० | १३ | ०-५-८ |
| २२ | | १६५ | २ | ०-३-८ |
| २३ | | ३११ | ९ | ०-४-८ |
| २४ | | ३२० | ६ | ०-२२-० |
| २५ | | ३४३ | ११ | ०-४-४ |
| २६ | | ३५२ | ४ | ०-१४-४ |
| २७ | | ३२६ | २ | ०-१३-० |
| २८ | | ३२६ | ५ | ०-११-१२ |
| २९ | | ३४१ | ८ अ | ०-४-० |
| ३० | | १५५ | ६ अ | ०-३-० |
| ३१ | | १६१ | ७ | ०-२-४ |
| ३२ | मौजे : पागोटे २८८ I/८५-८६ | ५८ | ८ | ०-५-१२ |
| ३३ | | ६४ | ३ अ | ०-१३-० |
| ३४ | | ३४ | १ | ०-१४-१२ |
| ३५ | | ४७ | ७ | ०-२-४ |
| ३६ | | ११० | ५ | ०-७-८ |
| ३७ | | ८१ | ४ | ०-११-१२ |
| ३८ | | ८५ | १ | ०-१३-८ |
| ३९ | | २७ | ३ | ०-७-० |
| ४० | | ३२ | २ | ०-७-८ |
| ४१ | | ८७ | ८ | ०-१२-० |
| ४२ | | २५ | ४ | ०-५-१२ |
| ४३ | मौजे : पागोटे २८८ II/८५-८६ | ९३ | ७ | ०-१७-० |
| ४४ | मौजे : पागोटे २८८ III/८५-८६ | ८ | २+३ | ०-५-० |
| ४५ | | ९ | ५ | ०-४-१२ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ५ हे कै. प्रकाश कमळ्या पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१२/१०/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

पृष्ठ क्र.१ वरुन...

# सिडकोच्या व्यवसाय सुलभता कक्षाचे उद्‌घाटन

आली आहे. या एकाच पोर्टलवर अर्ज सादरीकरण, अर्जांचे मूल्यमापन आणि अर्जांचा निपटारा होणार आहे. या सेवा अधिक पारदर्शक व प्रतिसादात्मक पद्धतिने पुरविणे, नागरिक आणि शासन यांच्यातील सुसंवाद वाढवणे, २४७ तत्त्वावर सेवा पुरविणे ही सिडकोच्या व्यवसाय सुलभतेची उद्दिष्टे आहेत. सध्या व्यवसाय सुलभता पोर्टल अंतर्गत वसाहत सेवा (६४ दुय्यम सेवा), बांधकाम परवाना सेवा (०४ दुय्यम सेवा), अभियांत्रिकी सेवा (०३ दुय्यम सेवा), सर्वसाधारण सेवा (०४ दुय्यम सेवा) आणि नैना प्रकल्पा संदर्भातील सेवा (०४ दुय्यम सेवा) उपलब्ध करून दिल्या आहेत.

तसेच सदर पोर्टल नागरिकांना त्यांनी केलेल्या अर्जाची स्थिती आणि संबंधित विभागाकडून सेवा मिळण्यासाठी लागणारा कालावधीही जाणून घेता येणार आहे. विविध भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या क्यूआर कोडद्वारे व्यवसाय वापरकर्त्यांना आवश्यक ती कागदपत्रे आणि निपटाऱ्यासाठी लागणारा आवश्यक वेळ यांबाबतची अद्ययावत माहितीही सदर पोर्टलद्वारे मिळू शकणार आहे. नागरिकांना www.cidcoindia.com/eodb पोर्टलची माहिती करून देण्याच्या उद्देशाने सिडको भवनमध्ये नागरीक सुविधा केंद्रही (सीएफसी) स्थापन करण्यात आले आहे. अशाच प्रकारची सुविधा सिडकोच्या सर्व विभागीय कार्यालयांतही उपलब्ध करून देणे नियोजित आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक: सुनील कृष्णाजी पोतदार यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ संपादक : राकेश दिलीप पितळे R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायक्षेत्र-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान तर्फे किल्ले बांधणी स्पर्धा - २०२२ चे आयोजन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या गड-किल्ल्यांचा इतिहास आजच्या पिढीला समजायचा असेल तर त्यांच्या हातात आज मोबाईल ऐवजी त्यांना प्रत्यक्ष कार्यातून शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. त्यासाठी दगड-माती, चिखल- काळी-तांबडी माती त्यांच्या हाताला लागली पाहिजे. जवळपासचे गडकिल्ले यांना भेटी देवून त्यांची माहिती घेतली पाहिजे. त्यांना संरक्षित -संवर्धित केले पाहिजे तरच महाराष्ट्राचे हे वैभव टिकून राहील. हे सारे कृतीतूनच होईल.

छत्रपती शिवाजी महाराजांचे राजगड, रायगड, शिवनेरी, तोरणा, सिंहगड, प्रतापगड, पुरंदर, लोकगड, पन्हाळा, सिंध-दुर्ग, विजयदुर्ग, विशाळगड, मंगरुळगड आदी महत्त्वाची किल्ले श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात होते त्यात महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू व गोवा या राज्यातील किल्ल्यांचाही समावेश आहे यापैकी सुमारे १११ किल्ले श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधल्याची नोंद एका बखरीत आहे. तसेच त्यांनी ४९ किल्ले डागडुजी करून त्यात आवश्यक ते बदल केले व ते अभेद्य बनविले.

चला तर याचा आभ्यास करून या दिवाळीत नव्या कपड्यांसह पर्यावरणपूरक फटाक्यांची आतिषबाजी करत चटकदार-मसालेदार-खमंग फराळाबरोबर गोड-गोड लाडूची मजा घेत. चला तर मग आहात ना तयार !छत्रपती शिवाजी महाराजां नी बांधलेल्या गड-किल्ल्यांची प्रतिकृती बनवायला. गड- किल्ल्यांची माहीती आणि पुस्तकांसाठी संपर्क :सार्वजनिक वाचनालय म्हसळा.

संर्पक श्रीमती सायली चोगले ९२०९५१४४९२ स्पर्धा कालावधी :२१ ऑक्टोबर २०२२ ते २६ ऑक्टोबर २०२२ स्पर्धेची बक्षिसे: गटानुसार बक्षीस १)प्रथम - सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र २) रे द्वितीय सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र ३) तृतीय - सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र ४) उत्तेजनार्थ ५ ) बक्षीस व सहभाग प्रमाणपत्र स्पर्धेत सहभाग नोंदणीसाठी संपर्क :१) कौस्तुभ करडे - ९८५०९१८१५०२) विशाल सायकर-९२७१७२७२०३ ३) संतोष कुडेकर९४२०६५०५७२४) संतोष उद्धरकर ७८७५८७१७७ गर्जा महाराष्ट्र प्रतिष्ठान

## रानसई येथील संपूर्ण सागाचीवाडीचा शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । उरण**

गुरुवार दि.२०/१०/२०२२ रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून तसेच उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यातील रानसई येथील संपूर्ण सागाची वाडीने शिवसेनेमध्ये जाहीर पक्षप्रवेश झाला. माजी आमदार मनोहरशेठ भोईर व तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांच्या हस्ते सर्व ग्रामस्थांनी शिवबंधन बांधून व भगवी शाल अर्पण करून सर्वांचे शिवसेनेत स्वागत करण्यात आले.



यामध्ये भास्कर बंगरी, दिनेश बांगरी, धाऊ बंगारी, काळूराम पारधी, महादेव बांगारी, ग्रामपंचायत सदस्य शेवंता पारधी, नरेश भला, शनिवार वीर, प्रवीण पारधी, किसन भला अंबाजी भाला, महादेव भगत, समाधान पारधी, गणेश बांगरि, विठ्ठल भाला, बुधाजी वीर, हिराजी पारधी, हिराजी भला, साईनाथ भला, गुरुनाथ पारधी, अविनाश भगत, नारायण वीर, धर्मा भला, महाधू भला, प्रमोद बंगारि, सूरज बांगारि, नरेंद्र पारधी, नरेश पारधी, जोमा पारधी, बबन ठोंबरे, धावू भला, पांडुरंग पारधी, नागेश बागारी, काळूराम बागारी, काळूराम भगत, कमलाकर भगत, हिराजी भगत, प्रकाश बागारी, राम बागारी, आल्या भगत, सुनील बागारी, धनाजी बागारी, रवी पारधी यांच्या नेतृत्वात संपूर्ण ग्रामस्थांनी व महिलांनी शिवसेनेमध्ये प्रवेश केला. या पक्ष प्रवेशाने माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांचा करिष्मा कायम असल्याचे दिसून येते. या वेळी विभागप्रमुख संदेश पाटील, उरण शहर संपर्कप्रमुख, गणेश म्हात्रे, कु कोमल भोईर, पी डी घरत, प्रकाश म्हात्रे, शिवसेना शाखा रानसईचे पदाधिकारी दीपक लेंडे, बाळाराम खंडवी, आयत्या दोरे, भास्कर बांगारी, पद्माकर वीर, रामा पारधी, मोहन उघडा, नरेश भल्ला उपस्थित होते.

## शारीरिक सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण शारीरिक सेनेचे अध्यक्ष ऋषी शेरेकर व कार्याध्यक्ष संकेत कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, तसेच पेण तालुका अध्यक्ष रुपेश पाटील यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण शारीरिक सेनेच्या रायगड जिल्हा अध्यक्षपदी निकेश पाटील, पेण तालुका अध्यक्षपदी प्रफुल्ल पाटील, पेण शहर अध्यक्षपदी आदित्य कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र एटीएसने पनवेलमध्ये कारवाई; पीएफआयच्या सचिवासह तिघांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' (पीएफआय) या संघटनेवर केंद्र सरकारने पाच वर्षांची बंदी घातली आहे. आयसिस या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आ-लेली आहे. असे असतानाही पीएफआय संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या हालाचाली सुरूच आहेत.

बंदी घालण्यात आल्यानंतरही पनवेलमध्ये पीएफआय संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या हालाचाली सुरूच आहेत. याच पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र एटीएसने पनवेलमध्ये कारवाई केली असून सचिवांसह तिघांना अटक केली आहे.

पनवेलमधून पीएफआय पनवेलचे सचिव अब्दुल रहीम याकूब सय्यद यांच्यासह सदस्य मोईज मतीन पटेल, मोहम्मद आसिफ खान आणि तन्वीर हमीद खान यांना एटीएसने अटक केली आहे.

पनवेलमध्ये यांची बैठक झाल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. याच पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र एटीएसने पनवेलमध्ये कारवाई केली आहे.

## पोलीस निरिक्षक पाटील यांचा माणगांवकर व पत्रकारांना दिपावलीनिमीत्त खास संदेश

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र पाटील यांनी पत्रकारांना दिपावली निमीत्त खास पोलीस ठाण्यात बोल-ावुन शुभेच्छा दिल्या. यावेळी संवाद साधताना माणगांवकरांनाही दीपावलीच्या खास शुभेच्छा व्यक्त केल्या. कोरोना वर्ष कडक निर्बंधात गेल्यानंतर पहिल्यांदाच यंदा मोकळेपणाने दिवाळी साजरी होत आहे. दिवाळीसण सर्वांनी आनंदात साजरा करावा तसेच दिवाळीत लहान मुले फटाके फोडताना पालकांनी त्यांची विशेष काळजी घ्यावी.

तसेच दिवाळीनिमीत्त खरेदीसाठी फिरताना गर्दी होत असते, अशावेळी वाहतुकीच्या नियमांचे कटाक्षाने पालन करून आपल्या गाड्या पार्किंग करताना देखिल ट्रापिक जॅम होणार नाही याची दक्षता घ्यावी. आपण दिवाळी साजरी करण्यासाठी आपल्या गावी नातेवाईकांकडे परगावी जाताना आपले शेजारीपाजारी यांना त्याची कल्पना देऊन घर व्यवस्थित सुरक्षित बंद करूनच जावे.

कारण अलीकडे माणगांव शहरात घरफोडी चोरीचे प्रमाणात वाढ झाली असून पोलीसांची यावर करडी नजर आहेच. परंतु मोठे शहर आणि वसाहती व मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी त्यामुळे सर्वांना याची विशेष काळजी घ्यावी लागेल. अशा प्रकारे दिवाळीच्या शुभेच्छा देण्याच्या निमित्ताने नागरिकांना जागरूक राहण्याची सूचनाही देण्यास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील विसरले नाहीत.



**PUBLIC NOTICE**

This is to inform public at large that my client Mrs. Anita Sunil More Residing at: Flat no. B4- 204, Kalpataru CHS, Near Rajiv Gandhi Stadium, Sector-8B, CBD, Belapur, Navi Mumbai - 400614 W/o Late Sunil Atmaram More her late husband Late Sunil Atmaram More has purchased the Shop no. 27 in Vindhya Commercial premises Co-operative Society Ltd., Plot no. 01, Sector-11, CBD, Belapur, Navi Mumbai-400614 and availed the loan from Yes Bank. My client paid the entire loan amount of the Yes Bank, the original documents of the said shop is still with the Yes Bank and same confirmed by the bank vide letter dated 16/09/2022. My Client has filed the application for the Heirship before the Civil Judge Senior Division Thane vide Civil M.A. no. 1209/22. If anyone who has/ have her/ his/ their claim, right, objection, or interest in the said shop by way of sale ,exchange, mortgage ,gift, trust, inheritance, possession, bequest, lease, lien, easement ,development or otherwise should raise his / her/ their claim within 7 (Seven) days from the date of this Notice, failing which , it shall be presumed that the aforesaid said shop is free from any encumbrances and charges and Mrs. Anita Sunil More is the absolute owner of the documents of the said shop and is fully entitled to get the same in whatsoever manner she may desire.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**Shop no. 27 in Vindhya Commercial premises Co-operative Society Ltd., Plot no. 01, Sector-11, CBD, Belapur, Navi Mumbai-400614**

**Sd/-**
**VANDANA**
**Adv. High Court**
**610, 6th Floor, Prabhat Centre Annex, Sector-1A, CBD, Belapur Navi Mumbai-40061**
**Mob-:9820465918**

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड**

क्रमांक / आरटीएस अपिल क्र.३०३/२०२१

१) श्री.कुणाल बनवारीलाल गुप्ता
रा.७/एबी, जमनादास गुप्ता मार्ग, देवनार,
मुंबई-४०००८८ अपिलार्थी
विरुद्ध
१) श्रीम.वंदना कांता कडू
२) श्री.रमेश कांता कडू
३) श्रीम.वंदना अनंता कडू
४) श्री.आकाश अनंता कडू
अ.क्र.१ ते ४ रा.चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीम.वत्सला बाळाराम भगत
रा.रिटघर, ता.पनवेल, जि.रायगड
६) श्री.मोतीराम भिकाजी घरत
रा.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
७) श्री.दिलीपकुमार जसवंतराज शाह
रा.फ्लॅट नं.२४०१/२४०२, ए विंग, श्रीपती टॉवर,
२४ वा मजला, पिंपळवाडी तात्या घरपुरे पथ,
गिरगाव, मुंबई-४००००४
८) श्री.शिवानंद शंकर कोरे
रा.फ्लॅट नं.ए/५०१, ईश्वर को.ऑप.सोसायटी लि.,
प्लॉट नं.३, सेक्टर ५०, नेरुळ, नवी मुंबई-४००७०६
९) श्री.अमर मलाराम गेहलोत
रा.फ्लॅट नं.१७, ५ वा मजला, बिल्डींग नं.१५,
नवजीवन सोसायटी, डी.बी.मार्ग, लॅमिंटन रोड,
ग्रॅण्ड रोड, मुंबई (पुर्व)-४००००८
१०) श्रीम.अपेक्षा मनोज अगरवाल
रा.फ्लॅट नं.बी.७०८, ७ वा मजला, व्टिन टॉवर,
लोखंडवाला कॉम्प्लेक्स, दुसरा क्रॉस रोड,
राजपूत डेरीवरती, आझाद नगर, अंधेरी (पश्चिम),
मुंबई-४०००५३ उत्तरार्थी

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे : चिंध्रण, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.६३/५ क्षेत्र ०-१९-० आकार ०.४७, सर्व्हे नं.६३/६ क्षेत्र ०-०९-० आकार ०.२३ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि.२२/१२/२०२१ रोजी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होवू शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपिलामध्ये दि.०२/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सु-नावणी निश्चित करण्यात आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास आपले गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०३/१०/२०२२

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी रायगड**
**अलिबाग करिता**

ॲड. मच्छिंद्रनाथ आ. घरत

**जाहिर नोटीस**

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१८४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/११/२०२२

कै. भास्कर शिवराम पाटील ( मयत तर्फे वारस )
१. श्रीमती. आनंदीबाई भास्कर पाटील (पत्नी)
वय - ९४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. श्री. हेमंत भास्कर पाटील
वय - ५९ वर्षे, व्यवसाय -नोकरी
वरील अर्जदार क्र. १/१ व १/२ रा. रूम नं. १०१,
घर नं. ५५०, उरण मोरा रोड, ता. उरण, जि. रायगड
३. श्री. शशिकांत भास्कर पाटील
वय - ७४ वर्षे, व्यवसाय -नोकरी
रा. सी १०४ एकदंत अपार्टमेंट, उरण मोरा
रोड, स्वामी विवेकानंद चौक, उरण, रायगड
४. श्रीमती. गीताजली भालचंद्र पाटील (लग्नानंतरची)
उर्फ प्रमिला भास्कर पाटील
वय - ६६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. ६ लोर, कॉसमॉस टॉवर, ओल्ड आग्रा रोड,
नवणीत मोटर्स जवळ, ठाणे वेस्ट, ठाणे,
महाराष्ट्र- ४००६०१
५. श्रीमती. लता रमेश पाटील
उर्फ लता भास्कर पाटील
वय - ७२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. बिल्डींग नं. १०, हाय लाईन पार्क,
नियर कोलशेत डि. मार्ट ठाणे,
महाराष्ट्र- ४००६०१ अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. भास्कर शिवराम पाटील यांचे निधन दि. ०६/११/१९९६ रा. जुन्या पोस्टाची चाल, ता. उरण, जि. रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै. भास्कर शिवराम पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. भास्कर शिवराम पाटील यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरीता भुसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- बोकडविरा ता. उरण, जि. रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | बोकडविरा २०१/८७ | ९८ | ३ | ०-०९-० |
| | | ९८ | ५ | ०-०५-६ |
| | | ९९ | ४ | ०-६-६ |
| | | १०२ | ५ | ०-०७-३ |
| | | ११० | १ | ०-०५-० |
| २. | बोकडविरा २०२/८७ | ५६ | १२ | ०-२-५ |
| | | ११३ | ३ | ०-११-० |
| | | १२१ | १४ | ०-३-० |
| | | १२६ | १४ | ०-२-० |
| ३. | बोकडविरा २०३/८७ | ११३ | ४ | ०-५-१ |
| | | ३५ | १ | ०-१४-९ |
| | | ५५ | ७ | ०-१-३ |
| | | ५६ | १ | ०-२-५ |
| | | ११६ | १२ | ०-८-८ |
| | | ११८ | १० | ०-४-० |
| ४. | बोकडविरा २८७/८७ | ११६ | १ | ०-०१-५ |
| ५. | बोकडविरा ६१/८६ | १८७ | १A | ०-२५-१२ |
| | | १७३ | ४ | ०-०४-४ |
| | | १९० | ४ | ०-१४-४ |

**मौजे- भेंडखळ, ता. उरण, जि. रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | भेंडखळ ११८.१७४ | १६० | ९ | ०-३-१२ |
| | | १७२ | २ | ०-६-१२ |
| | | १७२ | ३ | ०-२१-१२ |
| | | १७४ | ११ | ०-६-३ |
| | | १७२ | १ | ०-०-१२ |
| | | १७२ | ६ | ०-५-१२ |
| | | १७४ | १ | ०-७-८ |
| २. | भेंडखळ १००/८५-८६ | ८८ | ८A | ०-१७-० |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र. १ ते ५ हे कै. भास्कर शिवराम पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना. कोर्टात प्रस्तूतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत दयायची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकिलांमार्फत न्यायालयांत हरकत न घेतल्यास ना. कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरिल अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

आज ता.१७/१०/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

ॲड. मच्छिंद्रनाथ आ. घरत

**जाहिर नोटीस**

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१९५/२०२२
नि.नं.८/ड

१.कै. किशोर शंकर पाटील
१/१ श्रीमती. किशोरी किशोर पाटील (पत्नी)
वय - ५७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
१/२ श्री. प्रविण किशोर पाटील (मुलगा)
वय - ३१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
१/३ श्री. कुणाल किशोर पाटील (मुलगा)
वय - ४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
१/४ श्री. केतन किशोर पाटील (मुलगा)
वय - २८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. वरील अर्जदार क्र. १/१ ते १/४ रा. मराठी स्कुल
जवळ, बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड,पिन- ४००७०२
२.कै. पुष्पा रघुनाथ मढवी (लग्नानंतरची)
उर्फ पुष्पालता शंकर पाटील (मयत तर्फे वारस)
२/१ श्री. महेश रघुनाथ मढवी
वय ४८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. घर नं. २२, कवडे नगर, गणेश मंगल
कार्यालया जवळ, पिंपळे गुरव, पुणे -४११०२७
२/२ श्री. शैलेश रघुनाथ मढवी
वय -४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. घर नं. २२, कवडे नगर, गणेश मंगल कार्यालया जवळ,
नवी सांगवी, पुणे -४११०२७
२/३ श्रीमती. हेमलता नितीन म्हात्रे (लग्नानंतरची)
उर्फ रमा रघुनाथ मढवी
वय - ३९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. घर नं. २२, कवडे नगर, गणेश मंगल कार्यालया जवळ,
नवी सांगवी, पुणे -४११०२७
३. श्रीमती. रशीला आत्माराम म्हात्रे (लग्नानंतरची)
उर्फ रशीला शंकर पाटील
वय - ३९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. गणपती मंदिरा जवळ, घर नं. ८९४, नागाव,
ता. उरण, जि. रायगड, पिन- ४००७०२
४. श्री. विलास शंकर पाटील
वय - वर्षे, व्यवसाय -
रा. बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड, पिन- ४००७०२
५. श्री. नंदकुमार शंकर पाटील
वय - ६१ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
रा. आनंद नगर, रूम नं. १ बी विंग, ग्राऊड लोर
ता. उरण, जि. रायगड, पिन- ४००७०२
६. श्रीमती. जयवंती महादेव पाटील (लग्नानंतरची)
उर्फ जयवंती शंकर पाटील
वय - ५१ वर्षे, व्यवसाय -गृहिणी
रा. ए. ३०३ राम राजश्री, सि.एच.एस. लिमिटेड. न्यु गोल्डन नेस्ट
रोड, इंद्रलोक फेम - २ भायंदर (पुर्व), ठाणे - ४०११०५
७. श्रीमती. संगीता नरेश पाटील (लग्नानंतरची)
उर्फ संगीता शंकर पाटील
वय - ५१ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. घर नं. ४ बोकडविरा, ता. उरण,
जि. रायगड, पिन- ४००७०२
८. श्रीमती. देवायानी दत्तात्रय म्हात्रे (लग्नानंतरची)
उर्फ देवायानी शंकर पाटील
वय - वर्षे, व्यवसाय -
रा. मराठी शाळे मागे, सेक्टर २०,
नेरूळ रोड, इर्ड. स. ओ. ठाणे अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. शंकर शिवराम पाटील यांचे निधन दि. २०/०३/१९८२ रोजी रा. बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड येथे झाले आहे. अर्जदार क्र. १ ते ८ हे कै. शंकर शिवराम पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. शंकर शिवराम पाटील यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरीता भुसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- बोकडविरा ता. उरण, जि. रायगड**

| अ.क्र | गावाचे नाव/युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १. | बोकडविरा २८७/८७ | ११६ | १ | ०-०१-५ |
| २. | बोकडविरा ५५/८५ | ७ | ६ | ०-१२-० |
| | | ५ | १२ | ०-३-१२ |
| ३. | बोकडविरा २०१/८७ | ९८ | ३ | ०-०९-० |
| | | ९८ | ५ | ०-०५-६ |
| | | ९९ | ४ | ०-०६-३ |
| | | १०२ | ५ | ०-०७-३ |
| | | ११० | १ | ०-०५-० |
| ५. | बोकडविरा २०२/८७ | ५६ | १२ | ०-२-५ |
| | | ११३ | ३ | ०-११-० |
| | | १२१ | १४ | ०-३-० |
| | | १२६ | २४ | ०-२-० |
| ४. | बोकडविरा २०३/८७ | ११३ | ४ | ०-५-१ |
| | | ३८ | १ | ०-१४-९ |
| | | ५५ | ७ | ०-१-३ |
| | | ५६ | १ | ०-२-५ |
| | | ११६ | १२ | ०-८-८ |
| | | ११८ | १० | ०-४-० |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र. १ ते ८ हे कै. शंकर शिवराम पाटील यांचे वारस असून सदरहु अर्जदार क्र. १/१ हि सुन असुन अर्जदार क्र. १/२ ते १/४ आणि अर्जदार क्र. २/१ ते २/३ हे कै. शंकर शिवराम पाटील यांचे नात्याने नात व नातु असुन अर्जदार क्र. ३ ते ८ हे मुलगे आणि मुली आहेत. अर्जदार यांच्या व्यतीरिक्त मयत कै. शंकर शिवराम पाटील यांना अन्य कोणीही वारसदार नाहीत.

अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना. कोर्टात प्रस्तूतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत दयायची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकिलांमार्फत न्यायालयांत हरकत न घेतल्यास ना. कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरिल अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

आज ता.२०/१०/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## म्हसळा तालुका आरोग्य अधिकारी पदी डॉ.सागर काटे यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये प्रशासकीय कर्तव्यात कठोरपणा व शिस्त लावणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांच्या नव्या फतव्यामुळे राज्याच्या आरोग्य विभागाची झोप उडाली आहे. त्याचाच एक भाग म्हणून रायगड जिल्ह्यातही आरोग्य केंद्रांमध्ये रात्रीच्यावेळी रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळाली पाहिजे ह्या धोरणानुसार गेले २ ते ३ वर्षे रिक्त आसलेले म्हसळा तालुका आरोग्य अधिकारी पदावर डॉ. सागर काटे यांची नेमणूक करण्यात आली आहे.

डॉ सागर काटे हे कोलीवली नेरळ ता. कर्जत येथील रहिवाशी असून त्यांचे वैद्यकीय शिक्षण अहमदनगर येथे पूर्ण झाले आहे.ग्रामीण भागात आरोग्य सेवा समाजातील शेवटच्या व्यक्ती पर्यंत पोहचविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र नेरळ,प्रा.आ.केंद्र कोकबन, प्रा.आ.केंद्र म्हसळा येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून उल्लेखनीय काम केले आहे.

त्यांनी कोविड काळातील म्हसळा येथील कार्याची दखल घेऊन मा.मुख्यकार्यकारी अधिकारी आणि मा.जिल्हा आरोग्य अधिकारी राजिप अलिबाग रायगड यांनी त्यांचेवर जिल्हा समन्व्यक ( समुदाय आरोग्य अधिकारी), जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (ग्रामीण आरोग्य अभियान एन.एच.एम) आशा विविध जबाबदाऱ्या दिल्या डॉ.काटे यांना नुकताच वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकेल्याबद्दल साई आधार सोशल हेल्प फॉउंडेशन, नाशिक यांचे कडून महाराष्ट्र गौरवपुरस्कार २०२२ ने सन्मानित करण्यात आले आहे.

दिनांक १८ आक्टोबर पासून त्याच्याकडे म्हसळा तालुका आरोग्य अधिकारी पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांची म्हसळा तालुक्यात नेमणूक झाल्यामुळे तालुका आरोग्य विभागांतील मरगळ झटकली जाईल अशी चर्चा सुरु झाली.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# पूरनिवारणाबरोबरच जलसंधारण, नदी शुद्धीकरणावर भर देणार : आ. भरतशेठ गोगावले

**दै.रायगड नगरी । महाड**



सन २०२१ मध्ये महाड शहर आणि तालुक्याला महापुराचा जो तडाखा बसला, तसा पुन्हा बसू नये, नदी किनारी असलेल्या गावांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये अशा प्रकारच्या उपाययोजना करण्यावर आपण भर देणार असल्याची ग्वाही महाडचे आमदार श्री.भरतशेठ गोगावले यांनी आज (गुरूवारी) दादली येथे बोलताना दिली.

महाराष्ट्र शासन आणि हिरवळ प्रतिष्ठानच्या विद्यमाने महाड तालुक्यात'चला जाणू या नदी' या उपक्रमांतर्गत नदी संवाद यात्रेचा शुभारंभ दादली येथे करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. महाडच्या प्रांताधिकारी सौ. प्रतिमा पुदलवाड, हिरवळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष किशोर धारिया, पूरनिवारण समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.समीर बुटाला, दादलीचे सरपंच सुमित तुपट, श्री. सुधीर शेठ आदि मान्यवर यावेळेस उपस्थित होते. दादली येथे जाखमाता मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मंदिरात आणि कार्यक्रमानंतर भोईघाट येथे सावित्री नदीचे जल-पूजन करून या उपक्रमाचा आ. गोगावले आणि मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

दादली येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना आ.भरतशेठ गोगावले यांनी पूरनिवारण आणि नदी शुध्दीकरणासंदर्भात ते पाठपुरावा करित असलेल्या कामांची माहिती दिली. महाडला आलेल्या महापुरात, स्वच्छतेच्या कामांत विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेले योगदान कधीही विसरता येणार नाही, असे सांगितले. त्यानंतरच नदी पात्रातील गाळ काढणे, बंधारे बांधणे ही कामे करण्यात येत आहेत. जदीपात्रातील पाणी स्वच्छ आणि शुध्द राहणे गरजेचे आहे. बिरवाडी विभागातील गावांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा एक प्रस्ताव सीईटीपीच्या मदतीने तयार करण्यात आला आहे. पावसाळ्यात नदी पात्रातील पाण्याचा निचरा व्हावा यासाठी दादली येथे नवा पूल बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विभागाती गावांना औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी पुरविण्यात येणार असून, त्यासाठी दहा टक्के गावाचे आणि ९० टक्के सीईटीपीचे योगदान लाभणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. भावे, सांदोशी येथील धरणांची कामे वेगाने व्हावीत यासाठी आपा प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाडच्या प्रांताधिकारी सौ. प्रतिमा पुदलवाड यांनी, नदीचे पात्र गाळमुक्त आणि शुध्द करणे गरजेचे असल्याचे सांगत, पुढच्या पिढीसाठी आजच आपण हे का केले नाही, तर ती पिढी शुध्द पाणी आणि शुध्द हवेपासून वंचित राहणार असल्याची भीति त्यांनी बोलून दाखविली. नदी ही जशी जीवनदायिनी आहे, तशीच अतिरेक झाला तर ती जीवन कसे उध्दस्त करू शकते हे गतवर्षीच्या महापुरात आपण अनुभवले आहे. तसा अनुभव पुन्हा येवू नये म्हणून आतापासूनच प्रयत्नांना सुरूवात करायला हवी असे त्या म्हणाले.

हिरवळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी गनेक वर्षांपासून नद्यांमध्ये गाळ साठत गेल्याने गाळाने भरलेल्या या नद्या आता घरांमध्ये येवू लागल्या आहेत. विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. नदी पात्रातील गाळ काढण्याबरोबरच, नदी पात्रातील पाणी स्वच्छ आणि शुध्द राहील याचीही काळजी घेण्याची गरज असल्याचे सांगितले. सांडपाणी नदीपात्रात जाणार नाही याची काळजी घेणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधून जलसैनिक आणि महिला बचत गटांच्या माध्यमातून जलसेविका तार करण्यावर भर देण्यात येणार असून त्यांच्या माध्यमातून १ डिसेंबर पासून गावागावात जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रा. डॉ. समीर बुटाला यांनी नदी आणि नदीचे पर्यावरण याची विस्तृत माहिती यावेळेस दिली.

# आम आदमी पार्टी कोकण प्रांत संघटीका वैशाली कोळी यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी केला पक्ष प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**



आम आदमी पार्टी महाराष्ट्रात दिवसेंदिवस वाढत आल्याचे दिसत असून नवीन पनवेल बांठीया विद्यालयाच्या हॉलमध्ये आम आदमी पार्टीचा पक्ष प्रवेश कार्यक्रम पार पडला. महापुरुषांना वंदन करून या पक्षप्रवेश कार्यक्रमासाठी सुरवात झाली. महाराष्ट्र संघटक विजय कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र उपाध्यक्ष किशोर मांध्यान आणि कोकणप्रांत संघटक विलास घरत यांच्या प्रमुख उपस्थित पनवेल- उरण तालुक्यातील १० ते १२ गावच्या शेकडो महिला पुरुषांनी पक्षप्रवेश केला.

यावेळी उपस्थितांना महाराष्ट्र संघटक विजय कुंभार व महाराष्ट्र उपाध्यक्ष किशोर मांध्यान, विलास घरत व आयोजक कोकण प्रांत महिला संघटिका वैशाली संतोष कोळी यांनी प्रस्तावना करून मार्गदर्शन केले. व पक्षप्रवेश करून घेतला. राहुल कासारे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी उपस्थित आम आदमीचे हरिचंद्र वाघमारे, भोसले सर आवर्जून उपस्थित होते.

या कार्यक्रमाला मुख्यता आदिवासी समाज बांधव पनवेल-उरण येथील मोठी जुई, धाकटी जुई, विंधने, चिरनेर, टाकी गाव, चिरनेर येथील ७ आदिवासी वाड्यातील नागरिकानी प्रवेश केला. यात विद्यानंद घरत व प्रल्हाद पाटील, प्रमोद भगत, नरेश घरत यांनी विशेषतः मेहनत घेतली असून त्याच्याबरोबर नेहा कातकरी, विद्या कातकरी, लता कातकरी, राजू कातकरी, भुरी कातकरी, गुलाब कातकरी, लक्ष्मी कातकरी, हरीबाई जोशी, अंकिता ठाकूर, रिंकू दास, लता गायकवाड, चंद्राबाई कोळी, कृष्णाबाई कोळी, नथुरा कोळी, आदी सह शेकडो महिला पुरुषांनी प्रवेश केला.

# पुणे येथे रोहा रायगडच्या खो-खो संघाने पटकावले विजेतेपद

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

पुणे येथे संपन्न झालेल्या स्टुडंट्स ऑलिम्पिक राज्यसतरीय खो-खो स्पर्धेत ओम साई राम सानेगाव खोखो क्लब रोहा रायगड संघाने अंतिम सामन्यात आपल्या सर्वोत्कृष्ट कामगिरीचे जोरावर वर्चस्व प्रस्थापित करून विजेतेपदाचा बहुमान पटकावला.

या संघाने आपल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर विजेतेपद पटकाऊन रोहे तालुक्यासह रायगड जिल्ह्याचे नाव रोशन केले आहे.तर २७ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय खो खो स्पर्धेसाठी या संघाची निवड करण्यात आली असून कर्णधारपदी अनिरुद्ध हरिश्चंद्र जवरत,उपकर्णधार साहिल संतोष जाधव आणि कौशल संतोष मोरे तर खेळाडू म्हणून हितेश राकेश चंदणे , प्रतिक यशवंत जंगम,मनिष दिनेश मढवी ,हर्षल गणेश कोस्तेकर ,राज सचिन शेलार,यश विकास चोगले, पियूष पुंडलिक महाडिक, कार्तिक व्यंकटेश मुक्तीपाड,रितेश मंगेश गोवरधने.या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.तर कोच म्हणून सानिका जगदीश वाघमारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# नावडे उड्डाणपुलाची अवघ्या पाच महिन्यांत दयनीय अवस्था

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथे साडेतीन वर्षांपूर्वी बांधलेल्या उड्डाणपुलाला सहा महिन्यांत तडे गेले होते. त्यापाठोपाठ आता पनवेल-मुंब्रा महामार्गावरील नावडे उड्डाणपुलाचीदेखील अवघ्या पाच महिन्यांत दुरुस्ती करण्याची वेळ टी अ‍ॅण्ड टी कंपनीवर आली होती. त्यामुळे नावडे पुलाच्या कामाच्या दर्जाबाबतच साशंकता निर्माण होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-४ कळंबोली वसाहतीच्या बाजूने जातो. या महामार्गावर अवजड वाहनांची संख्या सर्वाधिक असते. याचे कारण म्हणजे बाजूला तळोजा औद्योगिक वसाहत, लोह- पोलाद मार्केट आहे. तसेच जेएनपीटीला जाण्याकरिता याच महामार्गाचा वापर करावा लागतो. उत्तर व दक्षिणेकडून येणारी जाणारी वाहनांची वर्दळ एनएच-४ वर असते. या महामार्गाची रुंदी कमी आहेच. शिवाय बाजूला लोकवस्ती असल्याने अपघातही झाले आहेत.

त्यामुळे नावडे येथून तळोजा औद्योगिक वसाहती जाण्याकरिता अनेकांना जीव मुठीत धरूनच रस्ता ओलांडावा लागत होता. याच कारणास्तव एमएसआरडीसीने ७० कोटी रुपये खर्च करून या पुलाची उभारणी केली होती. दोन वर्षांत हा पूल बांधणे अपेक्षित होते; परंतु कोरोनाकाळातील टाळेबंदीमुळे तीन वर्षांनंतर या पुलाचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता तरी नावडे गाव व नावडे फाटा येथे होणाऱ्या वाहतूक कोंडीतून सुटका होईल, अशी अपेक्षा होती; पण या पुलाची अवघ्या पाच महिन्यातच डागडुजी करण्याची वेळ आली आहे.

या संदर्भात रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही.

# बच्चे कंपनीला मातीच्या किल्ल्यांची भुरळ

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



दिवाळी म्हणजे मौज, मजा आणि आनंदाचा सण आहे. डिजिटल व रेडिमेड च्या युगात देखील बच्चे कंपनी किल्ले बनविण्यासाठी उत्सुक दिसते. बहुसंख्य गावांमध्ये अजूनही मुले किल्ले बनविण्याच्या विधायक उपक्रमात स्वतःला गुंतवताना दिसतात. यावर्षी कोरोनाचे सावट सरले असून कोणतेच निर्बंध नसल्याने रेडिमेड किल्ले, मातीचे मावळे व प्राणी आणि महाराजांच्या मूर्ती बाजारात मोठ्या प्रमाणात दाखल झाल्या आहेत. तसेच रेडिमेड किल्ले सुद्धा विक्रीला आले आहेत.

मागील वर्षीच्या तुलनेत यंदा किंमती १० ते २० टक्क्यांनी वधारल्या आहेत. आहेत व उठाव अधिक आहे. पालीतील कारागीर नारायण बिरवाडकर यांनी सकाळला सांगितले की कोरोनामुळे व्यवसाय ठप्प झाला होता. मूर्त्यांची विक्री निम्यापेक्षा अधिकने घटली होती. खूप नुकसान झाले होते. यंदा मात्र विक्री चांगल्या प्रकारे होत आहे. त्यामुळे समाधान आहे. पण परतीच्या पावसामुळे तयार मुर्त्या खराब होण्याची व नुकसानीची भीती आहे असे बिरवाडकर म्हणाले. पेण येथील पाचवीतील यज्ञा निरंजन सुर्वे या विद्यार्थिनीने सांगितले की शिवाजी महाराज, मावळे, विविध प्राणी यांच्या मुर्त्या किल्ल्यावर ठेवलेल्या बघायला खूप आवडते.

डोंगर, माळरान व शेतातून लाल किंवा काळी माती घमेल्यात किंवा पोत्यामध्ये टाकुन आणायची आणि सर्व मित्र मंडळी मिळून किल्ला बनविण्याची मज्जा काही औरच आहे. हा आनंद गाव व खेड्यातील तर काही प्रमाणात शहरातील मुले घेतात. किल्ल्याला मावळे, सैनिक, प्राणी व रंग यांनी सजवायचे. त्यावर पाण्याचे कारंजे लावायचे. मोहरी टाकुन गवत उगवायचे. रात्री किल्ल्यावर रोशनाई करायची अशा विधायक उपक्रम दिवाळीत अनेक गावातील मुले करतात. बच्चे कंपनीसह मोठे देखील यामध्ये सहभागी होतात. किल्ल्यावर ठेवण्यासाठी प्लास्टिक पेक्षा मातीच्या मूर्तींना मागणी आहे. बाजारात शिवाजी महाराज व मावळ्यांच्या विविध आकाराच्या व मुद्रांच्या आणि रंगांच्या मुर्त्या उपलब्ध आहेत. याबरोबरच मातीच्या ढाल, तोफा आदि युद्ध साहित्य देखील आहेत. शिवाय विविध देवीदेवता, प्राणी ( हत्ती, वाघ, बैल इत्यादी) सुद्धा मिळत आहेत. मध्यम आकाराची शिवाजी महाराजांची मातीची मूर्ती १२० ते १५० रुपयांना आहे. तर मातीचे मावळे, प्राणी २० ते ३० रुपयांत उपलब्ध आहेत. ठिकठिकाणी यामध्ये थोडाफार फरक आहे. सध्या रेडिमेड किल्ल्यांची चलती आहे. शहरात, इमारती, वसाहती आदी ठिकाणी मग हे रेडीमेड किल्ले लावले जातात. आणि त्यावर मावळे व शिवाजी महाराजांची मुर्ती विराजमान केली जाते.

# पारंपारिक नृत्य भवर स्पर्धेत धायरेश्वर खारपाले प्रथम तर नवचैतन्य महिला मंडळ जोहे द्वितीय

**दै.रायगड नगरी । पेण**

सर्वांसाठी सर्वकाही अशी ख्याती असलेल्या स्वररंग पेण फेस्टिवल मध्ये आयोजित केलेल्या पारंपारिक नृत्य भवर स्पर्धेत धायरेश्वर महिला नाच मंडळ मौजे खारपालेने प्रथम क्रमांक पटकावले. तर नवचैतन्य महिला नाच मंडळ जोहे यांनी द्वितीय व खारपालेच्या रुद्रअवतार नाच मंडळ यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

स्वररंग पेणने आयोजित केलेल्या पेण फेस्टिवल २०२२ मध्ये दररोज विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. आज झालेल्या पारंपारिक नृत्य भवर स्पर्धेत बक्षीस वितरण प्रसंगी स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, खजिनदार भारती साळवी, सचिव कौस्तुभ भिडे, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, सारिका पाटील, अनिकेत साळवी, मृगज कुंभार, अनिरुध्द पवार, नेहा कुंभार, शाल्मली भिडे, अभिराज कणेकर, चेतन मोकल, संदेश वर्तक, प्रशांत पाटेकर, तन्मय शिर्के, प्रसाद म्हात्रे, प्रेरणा रामधरने आदी मान्यवर उपस्थित होते.

पेण फेस्टिवल आयोजित पारंपारिक नृत्य भवर स्पर्धेसाठी पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, कर्जत, रसायनी, अलिबाग, महाड, रोहा, पाली, नागोठणे, माणगाव, कोलाड, गोरेगाव, खोपोली, चौक, खालापूर परिसरातील अनेक महिला नाच मंडळांनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून अलिबागचे अमोल कापसे व सोनाली पवार यांनी काम पाहिले.

---

अ‍ॅड.उज्वला अमित दंडवते

### जाहिर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१२३९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२/१२/२०२२

१) श्रीमती.विनिता विरेन लाड
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) कुमार साहिल विरेन लाड
वय : १७ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कुमार मानस विरेन लाड
वय : १५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
अर्जदार क्र.३ व ४ चे पालनकर्ता म्हणून
आई श्रीमती.विनिता विरेन लाड
४) श्रीमती.नंदिनी कृष्णा लाड
वय : ७५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व रा.सदनिका क्र.२/१, इगल सीएचएस,
प्लॉट नं.२३, सेक्टर ३, सिडको कॉलनी,
न्यू पनवेल-४१०२०६ अर्जदार

अर्जदार क्रमांक १ श्रीमती.विनिता विरेन लाड यांचे पती व अर्जदार क्र.२ कुमार साहिल विरेन लाड व अर्जदार क्र.३ कुमार मानस विरेन लाड यांचे वडील अर्जदार क्र.४ नंदिनी कृष्णा लाड यांचा मुलगा श्री.विरेन कृष्णा लाड हे दि.२३/१०/२०१८, सदनिका क्र.२/१, इगल सी एच एस, प्लॉट नं.२३, सेक्टर ३, सिडको कॉलनी, न्यू पनवेल ४१०२०६ येथे मयत झाले असून त्यांच्या मालकीची मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे परिशिष्ट**

1) Shop No.44, Ground floor, Building No.06 admeasuring about 178 Sq. ft. Carpet area in the building known as "HAWRE'S' NIRMITI", Plot No.15, Sector-22, Kamothe, Taluka-Panvel, Dist-Raigad. (50 % shares)

2) The Flat bearing No.2/1, admeasuring 756 Sq. Ft. (Super Built up area) in the society known as "Egale Co. Op. Hsg. Society Limited", Sector-3, New Panvel, Dist-Raigad. (50 % shares)

वरील मिळकतीबाबत अर्जदाराचे नाव वारस दाखला मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केला आहे. तरी वरील मिळकतीबाबत जर कोणाची काही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध अगर तक्रारी असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांत या न्यायालयात करावी. वरील मुदतीत कोणाची हरकत वा तक्रार न आल्यास व अर्जदाराचे हक्कशाबीत झाल्यास अर्जदाराचे विनंतीप्रमाणे त्यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दि.२०/१०/२०२२ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अर्जदाराचे वकील : अ‍ॅड.विपुल रमाकांत ठाकूर

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२१/१२/२०२२

१) श्रीमती.लाडकूबाई गोकुळ पाटील
वय : ७९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड ४००७०२
२) श्री.ज्ञानेश्वर गोकुळ पाटील
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.गोकुळ शांतू पाटील यांचे दि.०५/०३/२००९ रोजी मौजे धुतूम, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाले आहेत. कै.गोकुळ शांतू पाटील यांची पत्नी कै.गोमुबाई शांतू पाटील यांचे निधन दि.०५/०५/१९७७ रोजी मौजे : धुतूम येथे झाले आहे. अर्जदार हे कै.गोकुळ शांतू पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.गोकुळ शांतू पाटील यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : शेमटीखार यु.के.नं. १९/९१-९२ | ८ | ७ | ०-२३-० |
| | | १५ | ३ | ०-०७-६ |
| | | १५ | ६ | ०-००-२ |
| | | २७ | २ | ०-२६-२ |
| | | २८ | ४ | ०-१४-९ |
| २ | मौजे : शेमटीखार यु.के.नं. १९/९१-९२ | १८ | ५ | ०-१९-० |
| | | २० | ४ | ०-०९-९ |
| | | ३३ | २ अ | ०-०५-३ |
| | | ३३ | २ ब | ०-०७-७ |
| ३ | मौजे : मुठेखार यु.के.नं.७/८६ | १४ | १+२+३ +४/अ | ०-३६-० |
| ४ | मौजे : वालटीखार यु.के.नं.९१/८६ | ३५ | २ | ०-६-४ |
| | | ४ | ४ अ | ०-८-८ |
| | | ४ | ४ ब | ०-८-८ |
| ५ | मौजे : धुतूम यु.के.नं.१०९१ | ३२ | १ | ०-०३-३ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते २ हे कै. गोकुळ शांतू पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०७/१०/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण